# प्रेस नोट

हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत दिनांक २९/७/१८ रोजी पहाटे मांजरी भागात घरफोडी करीत असतांना आरोपी नामे प्रदिप विजय जाधव यास पाठलाग करुन नागरीकांनी व पोलीसांनी मिळुन रंगेहात पकडले व त्याचा साथीदार हा पळुन जाण्यात यशस्वी झाला. सदर आरोपीकडे चौकशी केली असता त्याने व त्याचा साथीदार यांनी मिळुन हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत घरफोडी केल्याचे कबुल केले.

चौकशी अंती आरोपी प्रदीप विजय जाधव याने हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत एकुन ८ गुन्हे केल्याचे कबुल करुन त्याचेकडुन एकुन २,५३,५००/-रु चा सोन्याचे दागीने व रोख रक्कम जप्त करण्यात आलेली आहे.

सदरचा गुन्हयांचा तपास मा.पोलीस उपआयुक्त सो. परीमंडळ-४, मा.सहा.पोलीस आयुक्त सो. वानवडी विभाग व हडपसर पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनील तांबे, पोनि कुंभार(गुन्हे), पोनि शिंदे यांचे सोबत तपासपथकातील अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, पोहवा युसुफ पठाण, पोना अनिल कुसाळकर, पोशि अमित कांबळे, पोशि ज्ञानेश्वर चित्ते, पोशि शाहीद शेख, पोना भोजराव यांनी सदरचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. पुढील तपास चालु आहे.